Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0014

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# ताराबाई शिंदेचा स्त्री-पुरुष समानतेचा विचार: एक ऐतिहासिक विश्लेषण

**संशोधनकर्ता**

**वितुल गोपीचंद रामटेके**

स्नातकोत्तर इतिहास विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

मो. नं. 9552310260 Email id: vitulr9@gmail.com

**सारांश**

प्रस्तुत विश्लेषण हे ताराबाई शिंदे यांच्या पुरोगामी विचाराबद्दलचे आहे. एकोणिसाव्या शतकाचा विचार केले असता त्याकाळात स्त्रियांना पुर्णपणे बंधनात ठेवण्यात असे स्त्रिला पुछा पुरुषांवर अवलंबुन राहावे लागत होते. पण ताराबाई शिंदे यांनी आपल्या स्त्रि-पुरुष पुस्तकात स्त्रि-पुरुष समानतेचे विचार मांडले आहे. पुरुषांना जेवेढे महत्य आहे तेवढेच महत्व स्त्रियांना सुड्धा हे दाखविण्या प्रयत्न करण्यात आले आहे.

## प्रस्तावना

१९ व्या शतकात समाजसुधारनांची महाराष्टात सुरुवात झाली. आगरकरांसारख्या विचारवंतांनी स्त्रीमुक्तीचे विचार मांडले. त्यांच्या विचाराने स्त्री मुक्तीच्या विचारात मोलाबी भर पडली. सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे आणि पंडिता रमाबाई यासारख्या स्त्रियासुद्धा सुधारणावादी विचारांनी प्रभावित झाल्या. प्रस्तुत संशोधन प्रामुख्याने ह्या पुरोगामी लेखिका कीतपत स्वतः ला पुरुषप्रधान संस्कृतीच्या विचारातून मुक्त करू शकल्या याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न आहे.

## ऐतिहासिक संशोधन पद्धती

ऐतिहासिक संशोधन पद्धतीमध्ये प्रश्नावली, सर्वेक्षण, मुलाखत इत्यादी पद्ध आहे. ही एक वैज्ञानिक योजना असून तिचा उद्देश तार्किक व श्रमबद्ध पद्धतीने नर्व तथ्यांचा शोध घेणे तसेच जुन्या तथ्यांमधील कार्यकारणभाव स्पष्ट करणे हा हो ऐतिहासिक संशोधन ही ऐतिहासिक जीवनाच्या विभिन्न पैलुच्या संदर्भात अध्ययन करण एक तार्किक योजना आहे. म्हणून संशोधन करण्यापूर्वी संशोधनाबाबत निश्चित स्वरूपा मार्गदर्शन करणारी संशोधनाची योजना बनविणे हे संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक अस म्हणुन प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आलेव आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) १९ व्या शतकातील स्त्री मुक्तीच्या विचारांचा आढावा घेणे.

२) सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे यांच्या लेखनातील स्त्रीमुक्तीची भूमिका तपासणे.

३) स्त्री मुक्तीची भूमिका मांडताना त्यांच लिखाण हे ऐतिहासिक दृष्टीकोनाला कितपत धरून होते ते तपासणे.

**कीवर्ड**

स्त्री, ताराबाई शिंदे, पुरुष, रमाबाई

**संशोधन साहित्याचा आढावा**

१) ताराबाई शिंदे (1882) द्वारा लिखित स्त्रि-पुरुष तुलना था पुस्तकात पुरुषा प्रमाणेच स्त्रियांना पण तीतकेच महत्व दिले जावे हे सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

२)) सावित्रीबाई फुले (1854) द्वारा लिखीत पुस्तक काव्य कुते मध्ये स्त्रि जीवनावर प्रकाश टाकण्यात आले आहे. त्याच्या माध्यमातुन तत्कालीन स्त्री जिवनावर प्रकाश पडतो

**ताराबाई शिंदेचे व्यक्तिमत्त्व**

ताराबाई शिंदे यांनी लिहिलेली स्त्री पुरुष तुलना ही पुस्तक अनेक सामाजिक घटकावर विचार करण्यास लावते. ताराबाई शिंदे हे व्यक्तिमत्व अफाट गुणवत्तेचे व सामाजिक भान असलेले असे एक दैदीप्यमान रत्न होते. फुले परंपरेने सत्यशोधकी साहित्याची वारसदार म्हणून त्यांना मोलाचा ठेवा आहे. त्या स्त्रीवादी विचारांच्या प्रखर पुरस्कर्त्या होत्या. त्यांनी लिहिले की, 'स्विजात्याभिमानाने' हे परखड लिखाण केले आहे.

स्त्रियांचे प्रश्न कोणकोणते आहेत यांची त्यांना जाण असल्याने त्या वैधव्याचे दुखः, पुनर्विवाहांना होत असलेला विरोध याचा त्या प्रखर निषेद करतात. त्यांची स्वीधर्माची व्याख्या ही अतिशय जाज्वल्यपूर्ण आहे, ओजस्वी व समर्पक आहे. पतीव्रतेचे सोंग कसे कुचकामी व थोडांत व निरर्थक आहे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. ९९ ताराबाई शिंदे यांनी विधवांची तत्कालीन वस्तुस्थिती स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पुनर्विवाह न करण्याची प्रथा ही कधीही न संपणाऱ्या रोंगाप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यवधी स्त्रिया वैधव्याचे असहय दुःख कसकसे भोगीत असतील व भोगतात त्यापासून कसकसे अनर्थ होत आहे व होत असतील याची कल्पना सुद्धा करिता येत नाही. मनोविग्रह करून मनुष्य

वस्तीत राहून स्त्री-धर्मरक्षण होणे शक्य नाही. एक केशवपण केले व दुसरे कुंकू पुसून सर्व सौभाग्य हिसकवून घेतले म्हणून काय झाले? त्यांचे अंतःकरण, बरे वाईटाचे विचार त्यांचे जवळच आहे. ताराबाईंना इथे एक प्रश्न येतो की, निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्यांच्या मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दारू पिऊन, जुवा खेळून, चोरी करून म्हणजेच कोणतेही वाईट कृत्य करून घरी आले असता त्यांच्या सेवेत हजर राहावे हा स्त्री धर्म. पण जेथे वाईट याचा विचार आहे तेथे स्त्री धर्म कसा राहील; तेथे विकल्प तेव्हाच येईल की नाही? तेवढे एक परद्वारच केल्याने पतिव्रत्य नेम मोडतो असे नाही. पतीव्रत्य मोडण्याला लक्षावधी कारणे आहेत आणि सर्वात मोठे कारण म्हणजे पतीचे वागणे. सावित्री आख्यानांत पतिव्रतेचे नियम सांगितले आहेत.[i]

त्यात सांगितले आहे की, पतीने लाथ मारली तर हसून म्हणावे की, नका पतीराया मारू हो, तुमचे पाय दुःखतील असं म्हणून महाराजाचे पाय लागलेच रगडीत बसावे. हाताने बुक्क्या काड्या मारल्या तरी रडू नये, हसावेच नी लागलेच ताझे लोणी घरी नसले तर शेजारणीचे धरून, नाहीतर बाजारांतुन विकत आणून स्वामीचे तळहात मारण्यानी तळहावले असतील म्हणून चोळावे. समोर ताराबाई शिंदे आपली प्रतिक्रिया देताना म्हणतात की, अशा नवऱ्याचे तळहात चोळण्याऐवजी यांचे हात चुलीत जाळावेत.[ii]

जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील त्यांजवर देवाप्रमाणेच ममता करून त्याचे सुखदुःख जाणावे की नाही? जसे देवभक्ती पाहून सदा प्रसन्न राहतात. भक्ताचे गुणदोष आढळते तर ते कसे तेव्हाच खरे खरे कारण सांगुन त्यांचा अपराध त्यांचे पदरात घालून ममतेने शासन करतात तसे यांनी करू नये. ताराबाई शिंदे यांचे म्हणणे आहे की, तर नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणे माणुन कोण वागेल.[iii]

ताराबाई शिंदेने स्वीचे महत्व पटवून देताना अनेक असे दाखले दिले आहे त्या म्हणतात की, तुम्हाला एकदा अतिउत्तम बागबगिच्यांनी नाना प्रकारच्या मौल्यवान चित्र विचित्र पदार्थांनी गाड्या, घोडे, रथ, पालख्या, हत्ती, उंट, सैन्य सेवक समुदाय की जेथे तुमच्या तोंडातून शब्द बाहेर पडण्याचा मात्र उशीर अशी सर्व समृद्धी असलेल्या राजवाड्यात राजकीय थाटांत स्त्रीविरहित ठेवू द्या बरे? तुम्हाला तो राजवाडा केवळ स्मशान; ती उंच सुवण मंचकी गरम गदल्याची सेज केवळ चिताः तो सर्व सेवासमुदाय, मित्र, स्नेही, सेवकजण, शत्र, पंचपकवान, ते कडुलिंबाचे गोळे, उंच वस्त्रे, नाना परीचे रत्नखजीत अलंकार सर्वासारखे भासुन तुम्ही अगदी वेडे होऊन जाल फार तर

काय, त्यावेळीस देव जरी तुमचे पुढे प्रत्यक्ष उभा राहील तर तुम्ही त्याला देखील त्या सपाट्यात हाकलून लावाल यांत संशय नको. तेव्हा या सर्व गोष्टीवरून तुम्ही आपल्याशी तुलना करून पहा की, पुरुषविरहीन स्त्रियास तरी कसे सुख होईल बरे? जी तुमची दशा तीच तिची. तिलाही किती मोठ्या ऐशोआरामीत सर्व पृथ्वीचे सर्वाभौमत्य देऊन एकठी ठेवा, म्हणजे पहा तिची कशी दशा होते ती. ईश्वरने हा जोडा स्वेच्छेनेच नेमिला आहे. पहा पक्ष्यांपासुन तो निर्जीव झाडाझुडपांत देखील त्यांनी स्त्री जाती निर्माण केली आहेच.[iv] प्रत्येक गोष्टीला, जिनसेला, दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावांयुन शोभा येतच नाही. जोडी वाचुन कोणतेच काम नाही. तेव्हा या जगदारण्यांतून तुम्ही एकटे फिरू शकाल? हा संसार तुम्ही स्वतः चालवाल काय? प्रपंचाचे शेत तुम्ही एकटे नांगरून काढाल का? स्वीविरहीत तिचे मुखावलोकन न करिता तुम्ही अगदी संन्यासवुत्तेने एक दोन महिने तरी राहू शकाल काय? ज्याला स्त्री मुले बाहेर आहे तो कसाही त्याच्या सदगुणाने अगर दुर्गुणाने संकटात पडला किंवा त्यावर कोणाची खवगी झाली अथवा सावकाराचे देणे असेल तर, "त्यांच्या मुलाकडे पहा"[v] असे म्हणतात, तर यावरून काय झाले? त्याची दया करतो कोण? फक्त मुलाबाळाकरिता त्याची सोडवणूक होतो

**स्त्रियांवरील सामाजिक बंधन**

ताराबाई शिंदे यांनी स्वी-पुरुषांमधील तुलना करिता आणखीन एक फरक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीने पुरुषांच्या प्राणाकरिता रात-रात जपावे कदर पण पुरुषांनी तिची तीळभर सुद्‌धा (कबर) करू नये याकरिता ती सावित्रीचे उदाहरण देते की, कशाप्रकारे आपल्या पतीच्या प्राणाकरिता यम लोकापर्यंत पोहचून यम देवासोबत झगडून आणि आपल्या पतीचे प्राण तिने वापस आणले, त्याला पुन्हा जिवंत केले. पण पुरुषांमध्ये कोणीतरी आपल्या बायकोच्या प्राणाकरिता यमराजाच्या दरबारात तर नाहीच; पण उगीच त्या दरबाराच्या वाटेवर तरी गेलेला कुठे ऐकण्यात आला आहे काय? तर जसे एकदा सौभाग्य गेले म्हणजे स्त्रियांनी आपली तोंडे अगदी एकाद्‌या महान पुरुषांपेक्षाही महाजबर अपराद्‌याप्रमाणे काळी करून सर्व आयुष्यभर आंधारकोठडीत राहावे, ताराबाई म्हणतात की पुरुषांना सुद्‌धा त्यांची बायको मेल्यावर आपले तोंड काळे करून दाड्या मिशा भादरून यावत् जन्मपर्यंत कुठेही अरण्यवासात का राहू नये? एक बायको मेली की तिचे दहाव्या दिवशीच तुम्ही दुसरी करून आणावी, असा कोणत्या शहाण्या देवाने दाखला दिला आहे. जशी स्वी तसेच पुरुष असे त्यांचे मत आहे. इथे या झाशीच्या राणीचा शूरपणा सांगायला विसरत नाही. झाशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चारशे पाचशे स्त्रियांना निसर्ग होऊन

हातात संगिनी घेऊ द्या मग पहा तुमची कशी दुर्दशा उडेल. म्हणजे स्त्रियांमध्ये सामर्थ्याची कमी नसून ती सामाजिक बंधनात अडकली आहे, असे त्यांचे मत आहे.[vi]

**ताराबाई शिंदेचा समानतेचा विचार**

ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार केलेला असल्याचा दिसून येतो. ज्याप्रमाणे स्त्री-पुरुष यांना निसर्गाने बनवले तर त्यांना अधिकार सुद्धा समान असावे. त्यांच्या मते. जर आपण म्हणतो की आपल्या जीवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा मग इथे स्त्रियांच्या बाबतीत कसे काय वेगळा विचार ठेवावा. स्त्रिया दुसऱ्या मातीच्या, दगडाच्या नाहीत. तर जसे पुरुषांचा जीव महत्त्वाचा तसाच स्त्रियांचा पण. पतीराज एकदा स्वर्गवासी झाले म्हणजे स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय, त्यांच्या कपाळी मंग काय? माथ्यावरील एकदा सर्व केस कुरळे केसावर नापीकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अलंकार गेले, सुंदरपण गेले, तिला कुठे लग्नकार्यात, समारंभात, जेथे काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी का? तर तिचा नवरा मरण पावला, ती अभागी, करंव्या कपाळाची, तिचे तोंड पाहू नये, अपशकून होतो. मग ही विशेषणे तिला. अरे पण तिचा पती मेला, नाही कोण म्हणतो पण तो तिने नाही मारीला? देवाजवळ तिने काही प्रार्थना केलेली नाही. या स्वारीला देवा तू लवकर ने, मला याच्या कांचातूनसोडीव, पण हे राजश्री यमनगरीत गेल्यावर यांचे पाठीमागे आपली कशी दुर्दशा होईल या धास्तीने तरी ती अशी प्रार्थना करणार नाही.[vii]

---

[i] ताराबाई शिंदे, स्त्री-पुरूष तुलना, संपादक कोतापल्ले नागनाथ, सायन प्रकाशन, पुणे, २०१५, पृ. ३७

[ii] महेंद्र मुंजाळ, ताराबाई शिंदे लिखित स्त्री पुरूष तुलना, शब्दालय प्रकाशन,श्रीरामपुर, २०२०, पृ. ४३

[iii] ताराबाई शिंदे, स्वी-पुरूष तुलना, पृ. ८

[iv] विलास खोले, ताराबाई शिदि लिखीत स्त्री पुरूष तुलना, प्रतिभा प्रकाशन, पुणे,२०१५, पृ. १३

[v] ताराबाई शिंदे, स्त्री-पुरूष तुलना, सिद्ध प्रकाशन, दिल्ली, २०२३, पृ. १९

[vi] धनंजय किर, महात्मा ज्योतिबा फुले, पापुलर प्रकाशन, मुंबई, २०१८, पृ. ७३

[vii] ताराबाई शिंदे, स्त्री-पुरूष तुलना, संपादक कोतापल्ले नागनाथ, सायन प्रकाशन,पुणे, २०१५, पृ. १४